(23)

Volume 4, Issue 3, March 2024

# International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

IJARSCT

## TABLE OF CONTENTS

Histopathological Changes in the Intestine of Aetomylaeusnichoffii (Bloch & Schnaider, 1801) with Special Reference to Helminthic Infection
*Vasant Dongare* 1-3

Preliminary Study of Fish Fauna in Varandh Dam From Mahad Tehsil, Western Ghats, Maharashtra, India
*Lohar Dipali K. and G. B. Raje* 4-6

Empowering Atma Nirbhar Bharat: Unveiling the Microscopic Threads of Socio-Economic Progress through Artificial Intelligence and Drone Technology
*Mr. Amol Dilip Rajeshirke and Mrs. Snehal A. Khanvilkar* 7-23

Information Literacy in Education
*Dr. Kanfade A. S. and Kamble S. S.* 24-29

Digitalization of Education: Benefits and Drawbacks
*Divyang Hemant Patil* 30-32



Scanned with OKEN Scanner

Volume 4, Issue 3, March 2024

तत्वचिंतन आणि आत्मानुभूती ह्यांचा मनोहारी मिलाफ–पैस
*डॉ. सुजाता सचिन कुळकर्णी* 241-244

ब्रिटिशकालीन श्रीगोंदा तालुक्यातील व्यापार व चलनव्यवस्था
*डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे* 245-250

डिजिटल युगात कार्याचे भविष्य .एक अध्ययन
*डॉ. पराग वसंतराव पिंपळापुरे* 251-257

रायगड जिल्ह्याच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान व महत्व
*सुरेश सुदाम दुंडे* 258-264

महामार्ग अपघातांची मानसशास्त्रीय कारणमीमांसा व उपाय योजना
*प्रा. डॉ सुधाकर शिवाजी जाधव* 265-268

स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचा विकास
*डॉ. अंकुश मारुती सोहनी* 269-273

Awareness and Current Scenario of Electric Vehicles in Mumbai Metropolitan Region
*Suma Poojary and Gayathri N.* 274-278

Environmental Impact of Variations in the Oocytes Development of Freshwater Bivavlve, Lammelidens Marginalis During Different Seasons from Kurla Dam, Mahad Taluka (Raigad M.S.).
*Dr. Bhosale P.A.* 279-281

Diversity of Fishes Found in the Kajali River, of Lanja Tehsil Ratnagiri District (MS) India
*Ghoble S. S.* 282-284

HPTLC Profiling and Ethnomedicinal Use of Leaf Extract of Sida acuta L.
*Rajbhoj B. G., Dive S. H., Waghmare J. M.* 285-288

Solvent-Free Synthesis of Dihydropyrazolo [4',3':5,6] Pyrano [,3-d] Pyrimidine-5,7-Diones Derivatives by using Magnetic Hf- UiO-66 MOFs
*Sunil Gawali and D.V Mane* 289-293



Scanned with OKEN Scanner

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# ब्रिटिशकालीन श्रीगोंदा तालुक्यातील व्यापार व चलनव्यवस्था

डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे
सहयोगी प्राध्यापक आणि इतिहास विभाग प्रमुख,
सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा, अहमदनगर
ndwajage@gmail.com

इ.स. 1818 मध्ये अहमदनगर जिल्हा ब्रिटीशांच्या ताब्यात आला. ब्रिटीशांच्या ताब्यात आलेल्या अहमदनगर जिल्ह्याची व्याप्ती खूप मोठी होती. ब्रिटीशांनी अहमदनगर ताब्यात घेतल्यानंतर हेनरी पोतींजरची या जिल्ह्यावर नेमणूक झाली. त्याने अहमदनगर मध्ये कायदा व सुव्यवस्था निर्माण केली. ब्रिटीशांनी अहमदनगर जिल्ह्याची विभागणी विविध तालुक्यांमध्ये केली. इ.स. 1869 मध्ये प्रशासनाच्या सोयीसाठी अहमदनगरची पुनर्रचना करण्यात आली. ही पुनर्रचना करतेवेळी श्रीगोंदा तालुक्याची निर्मिती करण्यात आली.[1] इ.स. 1869 मध्ये अहमदनगर जिल्ह्यात दहा तालुके असून त्यापैकि श्रीगोंदा हा नव्याने निर्माण झालेला तालुका होता. श्रीगोंदा तालुक्याच्या निर्मितीवेळी श्रीगोंद्यात 87 गावे होती. पेशवे काळात श्रीगोंद्यातील अर्थव्यवस्था वेगळ्या प्रकारची होती. ब्रिटिश काळात या अर्थव्यवस्थेत बदल घडून आले. प्रस्तुत शोध निबंधातून ब्रिटीश काळात श्रीगोंदा तालुक्यातील व्यापार व चलनव्यवस्था कशा प्रकारची होती याची मांडणी केली आहे.

## श्रीगोंद्यातील व्यापार

### आयात

दौंड मनमाड रेल्वे मार्ग सुरू झाल्यानंतर ज्यावर्षी दुष्काळ पडत असे. त्यावेळी जबलपुर, नागपूर, माळवा, इंदूर आणि कानपूर या ठिकाणाहून धान्य आयात केली जात असे. तर सामान्य वेळी खानदेश व जबलपुर मधून धान्य आयात होत असे. तांदळाची (भाताची) आयात कोकणातील कल्याण येथून रेल्वेमार्गाने तसेच जुन्नर (जिल्हा - पुणे) येथून बैलगाड्यांच्या माध्यमातून व्यापार होत असे. कडूलिंबाची आयात निजामाच्या प्रदेशातून स्वस्त दरात होत असे. भाटीया बंधूंमार्फत ही आयात होऊन यातील काही माल मुंबईमार्गे युरोपला निर्यात होत असे. रॉकेल मुंबईहून बोहरा आणि भाटीया यांच्याकडून काही शहरांमध्ये आणि काही गावोगावच्या किरकोळ विक्रेत्यांना (मारवाड्यांना) पुरविले जात असे. पनवेल आणि पेन ( कुलावा ) येथून मिठाची आयात होत असे.मारवाडी लोक किंवा निजामाच्या प्रदेशातील व्यापारी आपले एजंट

ISSN 2581-9429 IJARSCT



Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

Scanned with OKEN Scanner

पनवेलला पाठवत. तिथून पुढे हे मीठ श्रीगोंद्यात येत असे आणि नंतर गावोगावच्या विक्रेत्यांपर्यंत पोहोचत असे. कापडाची आयात मुंबई, सोलापूर, पैठण , अहमदाबाद, बागलकोट, करमाळा ( सोलापूर) , नागपूर आणि येवल्याहून होत असे.कापड मुंबई, सोलापूर, अहमदाबाद, मद्रास, मालेगाव आणि इचलकरंजी येथून आयात होत असे. तयार कापड हे मुंबई आणि पुणे येथून येत असे. काही व्यापारी प्रत्यक्ष मिल मालकांशी संपर्क ठेऊन कापड विकत घेत असत.[2] श्रीगोंद्याला आयात होणाऱ्या वस्तूंमध्ये मुख्यता कापड ( देशी आणि युरोपीय ) नारळ, तांदूळ आणि किराणा मालाच्या वस्तु ज्या विशेषता पश्चिम घाटाच्या खालून येत असत.[3]

इ.स 1917 मध्ये जी.आय.पी. ( ग्रेट इंडिया पेनिन्सुला ) रेल्वेच्या श्रीगोंदा तालुक्यातील विसापुर, बेलवंडी व पिंपरी रेल्वे स्टेशनवरून झालेल्या आयातीवरून येथील आयात व्यापाराची कल्पना येवू शकते. इ.स. 1917 मध्ये आयात होणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तूंचे मूल्य विसापुर ( 17052) , बेलवंडी ( 7592) व पिंपरी ( 45467) रुपये इतके होते. या तीन ठिकाणांपैकी श्रीगोंदा येथून जवळच असणाऱ्या पिंपरी या रेल्वे स्टेशनवरून विसापूर व बेलवंडीच्या तुलनेत होणाऱ्या व्यापाराचे मूल्य जास्त होते.[4]

## निर्यात

श्रीगोंद्यातील निर्यात वस्तूंमध्ये ज्वारी, बाजरी, गहू, हरबरा, कडूलिंब, करडई, भुईमूग, कच्ची साखर किंवा गूळ, तेल, कापूस, देशी कापड, स्वयंपाकाची भांडी काही प्रमाणात मिरची इत्यादि वस्तूंची निर्यात होत असे. दौंड मनमाड रेल्वे सुरू झाल्यानंतर जबलपुर, नागपूर, बेलारी या ठिकाणाहून धान्याला मोठ्या प्रमाणावर मागणी असे. करडई तेलाची निर्यात पुणे, मुंबई आणि गुजरात विशेषता युरोप या ठिकाणी होत असे. तेलापासून बनवलेली पेंड संपूर्ण जिल्ह्यात गुरांसाठी खाद्य म्हणून पाठवत असत.[5]

श्रीगोंदा हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून त्याचे महत्व होते. श्रीगोंदा येथे व्यापाऱ्यांमार्फत वस्तूंची खरेदी केली जात असे. संपूर्ण तालुक्यातून याठिकाणी वस्तु येत.वस्तूंच्या खरेदीनंतर या वस्तु पुण्याला आणि विविध शहरांमध्ये निर्यात केल्या जात. श्रीगोंद्याजवळील पिंपरी रेल्वे स्टेशनवरुन या वस्तु निर्यात केल्या जात. तेली समाजाचे अनेक लोक श्रीगोंद्यात स्थायिक झाले होते. त्यांच्या मार्फत फार मोठ्या प्रमाणावर करडईच्या बीया मुंबईला पाठविल्या जात. तेल बियांशिवाय गहू, तेल, हरबरा, या वस्तु देखील निर्यात केल्या जात.[6] श्रीगोंदा तालुक्यामध्ये श्रीगोंदा, काष्टी, पेडगाव, मांडवगन , बेलवंडी बुद्रुक आणि कोळगाव हे महत्वाचे आठवडे बाजार होते. इ.स. 1899 च्या आकडेवारीनुसार येथील आठवडे बाजारांमधील आठवड्याची आवक जावक रुपयांमध्ये पुढीलप्रमाणे होते. श्रीगोंदा (1782रु.) काष्टी(360 रु.) पेडगाव (335 रु.) मांडवगन (280रु.) बेलवंडी बुद्रुक(235 रु.)कोळगाव (110 रु.) याप्रमाणे वस्तूंचा व्यापार होत असे. तसेच येथील स्थानिक बाजारात तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी,तूर व धान्ये,साडी,तुरवान,यूरोपियन कापड,तेल,तूप,नारळ, मिरची, मीठ, सुपारी, भाजीपाला, फळे, शेळी व मेंढी इत्यादींचा व्यापार होत असे.[7]



Scanned with OKEN Scanner

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

IJARSCT

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

जी.आय.पी.रेल्वेमार्ग हा श्रीगोंदा तालुक्याच्या मध्य भागातून जात असून दौंड मनमाड या दोन शहरांना जोडतो. या रेल्वे मार्गावर श्रीगोंद्यात पिंपरी, बेलवंडी व विसापूर ही तीन महत्वाची रेल्वे स्टेशन असून तेथून मोठ्या प्रमाणावर वस्तूंची निर्यात होत असे. इ.स 1916 या वर्षी या तीन रेल्वे स्टेशनवरून श्रीगोंद्यातून झालेल्या वस्तूंची निर्यात पुढीलप्रमाणे होती. कृषीवर आधारित वस्तूंमध्ये (24887 रु.), बेलवंडी (54476 रु.),पिंपरी (128696 रु.) याप्रमाणे निर्यात झाली होती. साल, लाकूड, गवत आणि इतर वन्य वस्तूंमध्ये विसापूर (1379 रु.),(बेलवंडी 71758 रु.)तर पिंपरी (128696 रु.) याप्रमाणे निर्यात झाली होती. तर इतर वस्तूमध्ये विसापूर 2612 रु., बेलवंडी 734 रु. व पिंपरी 6769 रु. याप्रमाणे निर्यात झाली होती.[8] इ.स. 1916 मध्ये विसापूर येथून सर्व निर्यात झालेल्या वस्तूंचे एकूण निर्यात मूल्य 29078 रुपये होते. बेलवंडी येथून निर्यात झालेल्या वस्तूंचे एकूण निर्यात मूल्य 126968 रु. तर पिंपरी स्टेशन येथील एकूण निर्यात मूल्य 155377 रु. होते. यावरून श्रीगोंदा तालुक्याची निर्यात कशी होती हे समजते. तसेच श्रीगोंद्याच्या अर्थव्यवस्थेत जी. आय. पी. रेल्वेचे महत्व देखील अधोरेखित होते.

इ.स 1919 मध्ये वीसापुर , बेलवंडी व पिंपरी या तीनही स्टेशनवरून होणाऱ्या आयात व निर्यातीच्या मुल्यावरून श्रीगोंदा तालुक्यातील व्यापार तोलाची कल्पना येते. श्रीगोंदा तालुका जी.आय.पी. रेल्वेमुळे पूर्व आणि पश्चिम दिशेने जोडला गेला. कृषि आधारित वस्तूंची निर्यात ही या वस्तूंच्या उत्पादनातील चढ उतारातून अवलंबून असे. त्यामुळे याठिकाणी व्यापाराच्या वाढीची मोठी अपेक्षा नाही अशी नोंद ब्रिटीशांनी घेतली होती. परंतु युद्धजन्य परिस्थितीत टनिंग झाडाची साल व तेलाला मोठी मागणी असल्यामुळे या वस्तूंच्या संदर्भात व्यापारास मोठी संधि असल्याचे देखील ब्रिटीशांनी नमूद केले होते. श्रीगोंदा तालुक्याचा व्यापारातील समतोल ही गोष्ट श्रीगोंद्याच्या व्यापाराच्या दृष्टीने महत्वाची बाब होती.[9]

## चलनपद्धती व बँकिंग

पेशवे काळामध्ये विविध कसाचे रुपये चलनामध्ये वापरले जात असे. ब्रिटीशांनी जेव्हा मराठी राज्य जिंकले त्यावेळी भारतात सोने व चांदी या प्रकारातील 994 नाणी अस्तीत्वात होती. ब्रिटीशांनी अहमदनगरमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर महसूल रोख स्वरुपात जमा करण्यास सुरुवात झाली. त्याच बरोबर महसुलाचे दर वाढविण्याचे धोरण देखील निश्चित करण्यात आले. महसूल विशिष्ट पद्धतिच्या नाण्यांमध्येच जमा करण्याचे धोरण देखील निश्चित झाले. महाराष्ट्रात ब्रिटिश सरकारने काही विशिष्ट नाण्यांमध्येच महसूल जमा करण्यासाठी हिणकस नाणी चालनातून दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील सावकारांशी कमाविसदारांच्या मार्फत संपर्क निर्माण करून कंपनीच्या रुपया संदर्भात विविध नाण्यांची किमत ठरवली गेली.ब्रिटिश शासनाने अहमदनगर प्रांतासाठी अंकुशी रुपया हे चलन प्रमाण धरले. ज्या रूपयावर अंकुश हे चिन्ह असे त्या रुपयास अंकुशी रुपया असे म्हणत.[10]

ISSN 2581-9429 IJARSCT



Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

Scanned with OKEN Scanner

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
IJARSCT
Impact Factor: 7.53
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 4, Issue 3, March 2024

ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या काळात तांब्याच्या नाण्यांमध्ये अंकुशी रुपया, बेलापुरी रुपया, चांभारगोंदि, चांदवडी ( नाशिक) जरीपटका ( नाशिक) आणि वाफगावी रुपया यांसारख्या चलनांचा उपयोग केला जात असे. इ.स. 1820 च्या सुमारास ब्रिटिश सरकारने 110 कोरे किंवा नवीन अंकुशी 101 सुलाखी अंकुशी, निर्मल चांदवडी, कोरे वाफगारी , 101 1/8 निर्मल जरीपटका , 105 निर्मल बारीक, बेलापुरी व कोरे चांदवडी , 106 1/8 सुलाखी मोठे बेलापुरी, चोपी व चांभारगोंदि नाण्यांबाबत आज्ञा केली होती.[11] इ.स. 1835 पर्यन्त ही नाणी अस्तीत्वात होती. त्यानंतर अंशता चांदी तांब्यांनी युक्त नाणी वापरात होती.चांदीची नाणी ही बादशाही रुपया, आठ आणे अधेली, 4 आणे पावली, 1/8 चवली याप्रमाणे होती.[12] 1/12 आणे म्हणजे एक पाई किंवा कवडी या नाण्यांचा उपयोग भाजीपाला किंवा किरकोळ सामान विकत घेण्यासाठी होत असे. ¼ आण्याला 80 कवडी असा भाव होता.[13]

इ.स **1835** पर्यन्त भारतातील विविध इलाख्यात वेगवेगळी चलने वापरात होती. ब्रिटीशांनी 1835 मध्ये भारतात एकछत्री चलन लागू केले. यावेळी भारतातील सोन्याची नाणी बंद करून चांदीचा रुपया हे नाणे संपूर्ण भारतासाठी प्रमाण मानण्यात आले. त्यामुळे 1835 मध्ये श्रीगोंधात चांदीचे नाणे वापरले जाऊ लागले. 1835 नंतर 1947 पर्यन्त हेच चलन ब्रिटीशांनी वापरले.इ.स 1870 ते 1883 दरम्यान संपूर्ण अहमदनगर जिल्हयात केवळ नऊ बँक होत्या. या बँकामधून पुणे, मुंबई, सोलापूर, नाशिक, धुळे आणि निजामचे राज्य या ठिकाणांशी बँकिंगचे व्यवहार होत असत. व्यवहारांमध्ये मारवाडी वाण्यांचा समावेश होत असे. 10 रुपयांपासून 5000 रूपयांपर्यंतचे व्यवहार या बँकांमार्फत होत असत. स्वातंत्र्योत्तर काळात या परिस्थितीत वदल घडून आला. इ.स. 1972 मध्ये श्रीगोंदा तालुक्यात पुढील बँकांच्या शाखा कार्यरत होत्या.स्टेट बँक ऑफ इंडिया ( श्रीगोंदा) , सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( श्रीगोंदा) , अहमदनगर जिल्हा सेंट्रल सहकारी बँक ( श्रीगोंदा, बेलवंडी, घारगाव ) अहमदनगर जिल्हा अर्बन केंद्रीय सहकारी बँक ( श्रीगोंदा) याप्रमाणे बँकांच्या शाखा कार्यरत होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात श्रीगोंदा तालुक्यातील बँकांची स्थिति फारशी चांगली नव्हती. केवळ कृषि उत्पन्नावर आधारित तालुका असल्यामुळे तसेच सर्व उत्पन्न जमीन महसुलाच्या माध्यमातून ब्रिटीशांकडे जात असल्यामुळे या ठिकाणी बँकिंग व्यवसायास जास्त संधि नव्हत्या.

### बाजारपेठा

मध्ययुगापासून व्यापाराच्या दृष्टीने आठवडे बाजार हे महत्वपूर्ण ठरत आले आहेत.छोट्या गावांमध्ये दुकानांच्या अभावामुळे गावातील लोक जीवनोपयोगी दैनंदिन वस्तूंसाठी आठवडे बाजारावर अवलंबून असत. अंतर्गत व्यापार हा शहरातील किंवा मोठ्या गावांमधील कायमस्वरूपी बाजारपेठा व आठवडे बाजार यावर अवलंबून असे. ब्रिटिश काळात श्रीगोंदा तालुक्यामध्ये पेडगाव, कोळगाव, मांडवगन , बेलवंडी , काष्टी व श्रीगोंदा या ठिकाणी आठवडे बाजार भरत असे. श्रीगोंधामध्ये या सहा महत्वपूर्ण बाजारपेठा होत्या. या बाजारपेठेत 250 ते 1500 लोक येत असत.[14] या बाजारपेठनमध्ये धान्य , कापूस , कापड, किराणा माल,

ISSN 2581-9429 IJARSCT



Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

Scanned with OKEN Scanner

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
IJARSCT
Impact Factor: 7.53
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 4, Issue 3, March 2024

भाजीपाला, ब्लंकेट , फळे, भांडी, चप्पल इत्यादि वस्तूंचा व्यापार होत असे.[15] यापैकी 25 बाजारपेठा या गुरांच्या होत्या. 72 बाजार पेठांपैकी सहा बाजारपेठा श्रीगोंयात होत्या. तर काष्टी येथे गुरांची एक बाजारपेठ होती.इ.स. 1878 नंतर दौंड मनमाड रेल्वेमार्ग सुरू झाल्यानंतर श्रीगोंद्याच्या व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली.

इ.स 1899 च्या सुमारास श्रीगोंदा तालुक्यामध्ये श्रीगोंदा ( सोमवार) , काष्टी (शनिवार),पेडगाव(शुक्रवार),मांडवगण(मंगळवार), बेलवंडी बुद्रुक (रविवार) , कोळगाव( बूधवार) याप्रमाणे आठवडेबाजार भरत असे.मध्ययुगात पिंपळगाव पिसा (शुक्रवार) या गावी देखील बाजार भारत असे. मध्ययुगात पिंपळगाव पिसा हीएक प्रसिद्ध बाजारपेठ होती. परंतु ब्रिटिश काळात दळणवळणाच्या सुविधांअभावी या बाजारपेठेचे महत्व कमी होत गेले. तसेच पेडगाव येथील बाजारपेठ देखील मुघल व मराठा कालखंडात महत्वाची होती. मुघल काळात पेडगाव येथे कायमस्वरूपी बाजारपेठ होती. ब्रिटिश काळात या बाजारपेठेचे महत्व कमी झाले. केवळ 1900 लोक या बाजारपेठेत जात येत असत. इ.स. 1950 पर्यन्त बनपिंपरि( रविवार), भांगणगाव ( गुरुवार) , म्हसे (गुरुवार),येळपणे( बुधवार) , यांसारखे आणखी आठवडे बाजार सुरू होवून बाजारपेठांमध्ये आणखी भर पडली.

इय.स 1889 मध्ये श्रीगोंदा या बाजारपेठेतून धान्याच्या स्वरुपात भात, गव्हू, ज्वारी, बाजरी, हरबरा, तूर आणि इतर किरकोळ धान्य इत्यादि वस्तूंची 345 रुपयांची उलाढाल होत असे. कपड्यांमध्ये साडी, चोळी, तूर्बान, परदेशी कापड इत्यादि वस्तूंची 1000 रुपयांपर्यंत उलाढाल होत असे. किराणा मालामध्ये तेल, तूप, नारळ,गूळ, मिरची, मीठ , सुपारी इत्यादि वस्तूंची 372 रुपयांपर्यंत उलाढाल होत असे. भाजीपाला व फळे यामध्ये 40 रुपयांची तर शेळी व मेंढी यांमध्ये 25 रूपयाची उलाढाल होत असे. यामध्ये कोळगाव येथील बाजारात एकूण 100 रु. तर श्रीगोंदा येथील बाजारात 1782 रुपयांची उलाढाल होत असे. याचा अर्थ श्रीगोंदा ही तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ होती.[16]

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाच्या धोरणांमधील बदलांमुळे बाजार समित्यांची स्थापना झाली.हे धोरण शेतकऱ्यांच्या हितासाठी आखले गेले. शेतकऱ्यांची अडवणूक होवू नये तसेच व्यापारावर व भावावर सरकारचे नियंत्रण राहावेया हेतूने बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. श्रीगोंदा तालुक्यामध्ये इ.स. 1960 मध्ये बाजार समितीची स्थापना झाली. परंतु प्रत्यक्षात या समितीचे काम 1966 या वर्षी सुरू झाले. येथील बाजार समिति करमाळा , सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बारामती इत्यादि शहरांशी व्यापारी व्यवहार करीत असे.[17]

आज अहमदनगर जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांवर सरकारचे नियंत्रण असून शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा यासाठी प्रयत्न केला जातो. इ.स. 1950 मध्ये श्रीगोंदा तालुक्यातील बाजारपेठांची पुढीलप्रमाणे स्थिति होती. श्रीगोंयामध्ये आठवडे बाजरांची संख्या 12, गुरांचा बाजार 1 तर बाजारात येणाऱ्या लोकांची

ISSN 2581-9429 IJARSCT



Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

Scanned with OKEN Scanner

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
IJARSCT
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

संख्या 814 होती. यामध्ये काष्टी येथील गुरांचा बाजार हा महत्वपूर्ण बाजार होता. अशाप्रकारे श्रीगोंद्यातील बाजार पेठा या स्थानिक प्रकारच्या असून तालुक्याच्या संदर्भात येथे व्यापार होत असे.

## संदर्भ व तळटीपा


1. महाराष्ट्र स्टेट गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, पृ. 2
2. महाराष्ट्र स्टेट गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, पृ. 501
3. प्रथम सर्वे सेटलमेंट रिपोर्ट, श्रीगोंदा तालुका, मुंबई, 1889, पृ. 5.
4. द्वितीय सर्वे सेटलमेंट रिपोर्ट, श्रीगोंदा तालुका, मुंबई, 1919 पृ. 4.
5.महाराष्ट्र स्टेट गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, पृ. 503
6.प्रथम सर्वे सेटलमेंट रिपोर्ट, श्रीगोंदा तालुका, मुंबई, 1889, पृ. 5.
7. कित्ता , पृ. 114.
8. द्वितीय सर्वे सेटलमेंट रिपोर्ट, श्रीगोंदा तालुका, मुंबई, 1919 पृ. 4.
9. कित्ता , पृ. 5 .
10.पद्माकर प्रभूणे , महाराष्ट्रातील चलनाचा इतिहास, पुणे, 2007, पृ. 52
11. बॉम्बे गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, 1884, पृ. 299
12. कित्ता , पृ. 301.
13 .महाराष्ट्र स्टेट गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, पृ. 507
14. बॉम्बे गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, 1884, पृ. 551
15. इ.स. 1960 पर्यन्त ही संख्या 191 वर जाऊन पोहोचली.
16.प्रथम सर्वे सेटलमेंट रिपोर्ट, श्रीगोंदा तालुका, मुंबई, 1889, पृ. 4.
17 .महाराष्ट्र स्टेट गॅजेटियर , अहमदनगर जिल्हा, पृ. 538.




Scanned with OKEN Scanner

# INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCED RESEARCH IN SCIENCE, COMMUNICATION AND TECHNOLOGY

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

IJARSCT


# CERTIFICATE OF PUBLICATION


INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER
ISSN NO: 2581-9429


THIS IS TO CERTIFY THAT


डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे

सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा, अहमदनगर


HAS PUBLISHED A RESEARCH PAPER ENTITLED

ब्रिटिशकालीन श्रीगोंदा तालुक्यातील व्यापार व चलनव्यवस्था

**IN IJARSCT, VOLUME 4, ISSUE 3, MARCH 2024**


Certificate No: 032024-A0601
www.ijarsct.co.in

Crossref
DOI: 10.48175/568
www.doi.org
www.crossref.org

Research Publication Rating and Indexing
Journal Impact Factor
7.53
www.rpri.com


Editor-in-Chief